महाराष्ट्र शासन

E-mail: deskf10.rfd-mh@gov.in

क्र.एफएलडी-१९२३/प्र.क्र.२५/फ-१०
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : ०६.०२.२०२३.

प्रति,

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, नागपूर

विषय:- राज्यमार्ग क्र. १२१, निरा-बारामती (कि.मी. ६३/०० ते ६३/८९४) या रस्त्याच्या कामासाठी मोजे - पाणदरे, ता. बारामती, जि. पुणे येथील ०.३७९ हे. वनजमीन वळती करणेबाबत.

संदर्भ:- केंद्रस्थ अधिकारी यांचे पत्र क्र. कक्ष-१७/ नोडल / पुणे /ID-१३६५१(२४) /२१५५/ २०२२-२३,दि. २३.११.२०२२.

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये सार्वजनिक बांधकाम उपविभाग, बारामती यांना राज्यमार्ग क्र. १२१, निरा-बारामती या रस्त्याच्या कामासाठी मोजे - पाणदरे, ता. बारामती, जि. पुणे येथील ०.३७९ हे. वनजमीन वळतीकरणाचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे.

२. सदर पत्राच्या अनुषंगाने खालील मुद्याच्या अनुषंगाने शासनास माहिती सादर करावी:-

(१) स्थळ पाहणी अहवालामध्ये मौजे वाल्हे येथील पाण्याची टाकी व पाईपलाईनचे काम असल्याचे नमूद केले आहे. परंतु, सदर प्रस्ताव हा राज्यमार्ग क्र. १२१, निरा-बारामती (कि.मी. ६३/०० ते ६३/८९४) या रस्त्याच्या कामासाठी मोजे - पाणदरे, येथील जमिन वळतीकरणासाठी प्रस्तावित आहे. सबब, त्याप्रमाणे सुधारित स्थळ पाहणी अहवाल सादर करावा.

(२) शेती सिंचनासाठी भूमिगत पाण्याच्या पाईपलाईन टाकण्यासाठी मौजे. पाणदरे येथील ०.०२८ हे. वनजमिन वळतीकरणाच्या अनुषंगाने पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित केलेल्या मौजे साबळेवाडी, ता. बारामती, जि. पुणे येथील गट नं. १४३ मधील ०.१० हे. अवनत वनजमिनीची KML File सादर केली असल्याचे दिसून येते. त्यामुळे सुधारित KML File सादर करावी.

(३) KML File चे अवलोकन केले असता, मौजे साबळेवाडी, ता. बारामती, जि. पुणे येथील गट नं. १४३ मधील वनक्षेत्रात काही जमिन वहिताखाली तर काही क्षेत्रावर बांधकाम झाले असल्याचे दिसून येते. सबब, सदर क्षेत्रावर अतिक्रमण झाले आहे किंवा कसे, याबाबत अधिक माहिती सादर करण्यात यावी.

(४) पर्यायी वनीकरणाकरीता प्रस्तावित केलेल्या मौजे साबळेवाडी, ता. बारामती, जि. पुणे येथील गट नं. १४३ चा ७/१२ सादर करावा.

(गणेश जाधव)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन